**समर्पण**

ते गोड नितळसे पाणी
कुरणावर ओघळलेले
लटक्याने गवळणींनी
जणू केस झटकलेले

संथ लहर झुळूकली
त्या जळात गुंतून पडली
गवळण कुणी काठाशी
ओठ मुडपून हसली

वेणूनाद शांत पाण्यात
प्रतिबिंब तरंगे श्यामल
त्यावरी भाळुनी सगळ्या
बैसल्या आत्मनि निश्चल

अशा क्षणांनी बहरले
आसमंत अनंत निवांत
त्याचवेळी ती कुठुनशी
कृष्णसखी वनी अभ्रांत

उतरली रात्र अंधारी
गवळणी स्तब्ध अचंबित
बावरी एकटीच राधा
अथांग कृष्ण वलयात

**--संध्या रानडे**